46 C.C.1206(Legal)

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर
(stamp)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/-१८२२-/-१२-१३ दिनांक :- ८/८/२०१२

प्रति,
जमीन/जागामालक - मे. काशीमिरा सिरॅमिक प्रॉडक्ट प्रा.लि. व श्रीमती कांता अभिदास गांधी
अधिकार पत्रधारक - मे. काशीमिरा सिरॅमिक प्रॉडक्ट प्रा.लि. यांचेतर्फे श्रीमती संगिता विजय कुमार व इतर
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स दिलीप मेवाडा ॲन्ड असो.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - मिरा सि.स.क्र. १४४२ ते १४४६, १४९१ ते १५११, १५८६, १५८९ ते १६००, १६२९ व १६३०, १६४६ ते १६५२, १७९२, १८२९, १८८२ या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि.२५/०५/२०१२ चा अर्ज.
२) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./के-५२/एमसी/आयसी/जीएडी-१७७९, दि.०१/०८/१९७९, यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-१४६ + १८२ + ११४, दि.२७/११/१९८४ ची मंजुरी व पत्र क्र. यु.एल.सी./टिए/टे.नं.१/मिरा/एसआर-१४६ + १८२ + १४४, दि.२५/१०/०७ अन्वये सुधारीत आदेश.
३) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. आर.बी.IV-एनएपी/सीआर-१७/७४, दि.१५/०७/७४
४) दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील दि.२३/०८/२००६ चा नाहरकत दाखला.
५) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/४५५/११-१२, दि.१९/११/११ अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.
६) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/१३८७/२०१०-११, दि.१५/०७/२०१० अन्वये बांधकाम प्रारंभपत्र.

## -: बांधकाम प्रारंभपत्र :-

(फक्त जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ ( प्रकरण १२ सह ) विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – मिरा, सि.स.नं. १४४२ ते १४४६, १४९१ ते १५११, १५८६, १५८९ ते १६००, १६२९ व १६३०, १६४६ ते १६५२, १७९२, १८२९, १८८२ या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास वापरासाठीच करण्याचा आहे.
२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.